आर.सी.सी क्र.४३४/२०१४

सरकार विरुध्द सागर बावत

**निशाणी क्र. ५३/ क**

**अभियोग पक्षा तर्फे साक्षीदार क्रमांक- १ यांची जबानी-**

मी प्रतिज्ञापुर्वक शपथेवर निवेदन करतो की,

**माझे नाव – श्री. संदीप बाळकृष्ण विश्वरुपे,**

वय – ६३ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त-विभागप्रमुख विद्युत अभियांत्रीकी, मुंबई

निवासस्थान- स्टरलिंग टॉवर्स, बाणायत पुणे, जिल्हा पुणे

---

**सरतपासणी अभियोग पक्षा करीता**

**श्री. काझी ए.झेड, सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे तर्फे -**

१. दिनांक २४.०८.२०१२ पासून दिनांक १३.१२.२०१३ पर्यंत उप सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, औरंगाबाद या पदावर कार्यरत होतो. नोव्हेंबर -२०१३ मध्ये हिवाळी परिक्षा तंत्र निकेतनाच्या परिक्षा सूरु झाल्या होत्या. दिनांक १२.११.२०१३ ते ०४.१२.२०१३ या कालावधीमध्ये या परिक्षा घेण्यात येणार होत्या. दिनांक २३.११.२०१३ रोजी प्रथम वर्ष पदविकेचा बेसीक मॅथ १७१०४ हा पेपर होणार होता. दिनांक २२.११.२०१३ रोजी संध्याकाळी ०७.०० वाजता मी कार्यालयात कामकाज करीत असतांना कार्यालयीन दुरध्वनी २३३४०२५ या नंबरवर एक निनावी फोन आला होता. त्या निनावी व्यक्तीने दिनांक २३.११.२०१३ रोजी होणारे बेसीक मॅथची प्रश्नपत्रीका फुटल्याबाबत सांगीतले. त्यानंतर त्याच दिवशी (२२.११.२०१३ रोजी) साधारण संध्याकाळी आठ वाजता दैनिक पुण्यनगरी कार्यालय, औरंगाबाद येथून माझ्या sbvishwarupe@msbte.com या मेल आयडीवर २३.११.२०१३ रोजी होणारा बेसीक मॅथची प्रश्नपत्रीकेची स्कॅन कॉपी आली. परंतू तात्रींक कारणामुळे तेव्हा माझा मेल मला उघडता आले नाही म्हणून मी माझे मित्र श्री. एस.ए.कुलकर्णी, अधिव्यख्याता, यंत्र अभियांत्रीकी, शासकिय तंत्र निकेतन, जालना यांचे ई-मेल आयडी kantu66@redifmail.com यावर मी पुण्यनगरी कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडुन सदर स्कॅन कॉपी मागविली. सदर स्कॅन कॉपी मी ई-मेल द्वारे तंत्रशिक्षण मंडळ, मुख्य कार्यालय, मुंबई येथे

पाठविली. त्यानंतर मुख्य कार्यालयाने दिनांक २३.११.२०१३ रोजी होणारा पेपर पुढे ढकलल्याचे कळविले. सदर निर्णय आम्ही आमच्या कार्यालयाच्या अतंर्गत येणा–या वितरण केंद्राना दुरध्वनीद्वारे कळविले. मला त्याच दिवशी (दिनांक २२.११.२०१३ रोजी) रात्री १२.०० वाजता दुरध्वनीवर निनावी कॉल आला. त्या निनावी व्यक्तीने मला प्रश्नपत्रीकेचे काय झाले असे विचारले. मी त्याला असे सांगीतले की, दिनांक २३.११.२०१३ रोजी पेपर सुरू होईपर्यंत या विषयी काही सांगता येणे शक्य नाही. दिनांक २३.११.२०१३ रोजी सकाळी दैनिक पुण्यनगरी, सामना व महाराष्ट्र टाईम्स या दैनिकांमध्ये सदर पेपर फुटल्याची बातमी आली. त्यानंतर वरिष्ठ कार्यालयाच्या दुरध्वनीनुसार सकाळी ११.०० वाजता मी क्रांतीचौक पोलीस स्टेशनला पेपर फोडणा–या अज्ञात व्यक्ती विरुध्द लेखी फिर्याद दिली. मला आता लेखी फिर्याद दिनांक २३.११.२०१३ दाखविण्यात आली. मी दिलेली लेखी फिर्याद तिच आहे. त्यामधील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.५४** देण्यात येत आहे. त्यानुसार अज्ञात इसमा विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. मला आता छापील प्रथम खबर अहवाल दिनांक २३.११.२०१३ दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यामधील मजकुर बरोबर आहे. सदर छापील प्रथम खबर अहवाल यास **निशाणी क्र.५५** देण्यात येत आहे.

२. दिनांक २४.११.२०१३ रोजी पोलीसांनी मला क्रांतीचौक पोलीस स्टेशन येथे बोलविले. तेंव्हा माझा त्यांनी पुरवणी जबाब नोंदविला. सदर पुरवणी जबाबात मी असे सांगीतले की, दिनांक २२.११.२०१३ रोजी माझा मेल तात्रींक कारनाने न उघडल्यामुळे माझा मित्र एस.ए. कुलकर्णी यांचे मेल आयडी kantu66@redifmail.com या मेल आयडीवर दैनिक पुण्यनगरी कार्यालयातून प्रश्न पत्रीकेची स्कॅन कॉपी मागविली.

**मा. न्यायालयाची वेळ संपल्यामुळे उर्वरीत सरतपासणी पुढील तारखे पर्यंत तहकुब.**

| | |
|---|---|
| समक्ष | श्रवणोत्तर स्वीकृती. |
| **–/स्वाक्षरीत/–** | **–/स्वाक्षरीत/–** |
| ( श्रीमती ए.डी. बोस ) | ( श्रीमती ए.डी. बोस ) |
| मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद | मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद |

**दिनांक– २०/०९/२०२४**